**जोडपत्र 1**

**लघु उद्योग मंत्रालय,**

**अधिसूचना**

**नवी दिल्ली, 5 ऑक्टोबर, 2006**

एसओ 1722 (ई) एमएसएमईडी अधिनियम 2006 (2006 चा 27) च्या (ह्यानंतर ह्याला हा अधिनियम म्हणण्यात आले आहे) कलम 7 च्या पोटकलम (1) ने दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, केंद्र सरकार, येथे, ह्या अधिनियमाच्या कलम 7(1)(अ) मध्ये निर्देशित केलेल्या उद्योगांसाठी, कारखाना व यंत्रसामग्री मधील गुंतवणुक काढण्यासाठी, वगळण्यासाठी पुढील बाबी विहित करत आहे.

(1) अवजारे, जिग्ज्, रंग, साचे, देखभाल करण्यासाठीचे सुटे भाग ह्यासारखी साधन-सामग्री व कंझ्युमेबल माल

(2) कारखाना व यंत्रसामग्रीची स्थापना

(3) संशोधन व विकासासाठीची साधन सामग्री व प्रदूषण नियंत्रण साधने

(4) ऊर्जा निर्माण संच आणि राज्य वीज मंडळाच्या विनियमांनुसार त्या उद्योगाने स्थापन केलेले अतिरिक्त रोहित्र.

(5) राष्ट्रीय लघु उधोग निगम किंवा राज्य लघु उद्योग निगम ह्यांना दिलेले सेवा आकार व बँक आकार

(6) कारखान्याला व यंत्रसामुग्रीला विद्युत ऊर्जा पुरविण्यासाठी वापरणे आवश्यक आहेत अशा केबल्स, वायरिंग, बस बार्स, इलेक्ट्रिकल कंट्रोल पॅनल्स, (प्रत्येक यंत्रावर स्थापन न केलेले), ऑईल सर्किट ब्रेकर्स, किंवा मिनिएचर सर्किट ब्रेकर्सची खरेदी किंवा जोडणी/स्थापना

(7) गॅस निर्माण प्लांट्स

(8) देशात तयार केलेल्या यंत्रसामुग्रीसाठी, त्यांच्या निर्मितीच्या ठिकाणापासून, उद्योगाच्या ठिकाणी वाहून नेण्यासाठीचे परिवहन आकार (विक्री कर, मूल्यवर्धित कर व अबकारी कर सोडून).

(9) कारखाना व यंत्रसामुग्रीची उभारणी करण्यासाठीच्या तंत्रज्ञानासाठी दिलेले आकार

(10) कच्चा माल व चक्का/तयार माल साठविण्यासाठी असलेले व उत्पादन प्रक्रियेशी जोडणी नसलेले स्टोअरेज टँक्स.

(11) अग्निशामक साधने.

(2) वरील परिच्छेद 1 मध्ये संदर्भित केलेल्या, कारखाना व यंत्र सामुग्री मधील गुंतवणुक काढण्यासाठी, तो कारखाना व यंत्रसामुग्री नवी असो की जुनी, तिची मूळ किंमतच हिशोबात घेतली जाईल - मात्र, आयात केलेल्या यंत्रसामुग्रीबाबत, अशी किंमत काढण्यासाठी, पुढील गोष्टी त्या मूल्यात समाविष्ट केल्या जातील.

(1) आयात शुल्क (बंदरापासून ते कारखान्याच्या ठिकाणापर्यंत परिवहन करण्यासाठीचे आकार, बंदरावर दिलेले डिम्युरेज ह्यासारखे संकीर्ण खर्च सोडून).

(2) शिपिंग आकार

(3) कस्टम क्लियरन्स आकार आणि

(4) विक्री कर किंवा मूल्यवर्तित कर.

सही /-

**(एफ.क्र.4(1)/2006- एमएसएमई - धोरण)**

**जवाहर सिरकार, अतिरिक्त सचिव**